| | दुरध्वनी क्रमांक<br>(०७१३२) २२२६४२ | **जिल्हा परिषद, गडचिरोली**<br>**सामान्य प्रशासन विभाग**<br>**Email :- zpgadmail@gmail.com** |
|---|---|---|
| **सामान्य प्रशासन** | जा.क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-१(ब)५६७६ /२०१९, दि.:-१५/०८/२०१९ | |

प्रति,

श्री. / श्रीमती --------------------------------

मु.------------- पो. ------------- ता. ------------ जि. गडचिरोली

**विषय:-अनुकंपा तत्वावर प्रत्यक्षात उपलब्ध पदावर नियुक्तीसंबंधाने पात्र उमेदवार ठरविण्याकरिता मुळ दस्तऐवजासह उपस्थित राहणेबाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अनुकंपा तत्वावर जिल्हा परिषदेअंतर्गत वर्ग-३/वर्ग-४ चे पदावर नियुक्ती मिळण्यास आपण केलेल्या अर्जाचे अनुषंगाने जिल्हा परिषदेने कार्यालयीन परिपत्रक क्र. जिपग/साप्रवि/आस्था-१(ब)/अनुकंपा/४७६/२०१९.,दिनांक ०८.०२.२०१९ अन्वये संभाव्य नियुक्तीकरिता माहिती पुर्ण असलेल्या प्रकरणाची दिनांक १.१.२०१८ रोजीची अंतिम यादी प्रसिध्द केलेली आहे.

सदर प्रसिध्द यादीचे अनुषंगाने **अनुकंपा तत्वावर प्रत्यक्षात उपलब्ध पदावर** नियुक्तीसंबंधाने पात्र उमेदवार ठरविण्याकरिता आपण **दिनांक १९.०८.२०१९ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता, जिल्हा परिषद गडचिरोलीचे वीर बाबुराव शेडमाके सभागृहात** न चुकता शैक्षणीक अर्हता व इतर सर्व दस्तऐवज, जिल्हा परिषदेला सादर केलेले दस्तऐवजाच्या दुय्यम प्रती, जिल्हा परिषदेकडे वेळोवेळी शैक्षणीक अर्हता वाढविण्यास किंवा इतर कारणास्तव केलेल्या अर्जाचे तसेच जिल्हा परिषदेने दिनांक १.१.२०१८ रोजीचे प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या यादीवर घेतलेल्या आक्षेप अर्जाचे जिल्हा परिषदेच्या आवक शाखेकडुन पोच प्राप्त झाल्याचे प्रतीसह व त्यासोबत सादर केलेल्या दस्तऐवजासह स्वखर्चाने उपस्थित राहावे.

उक्त दिनांकास आपण न चुकता उपस्थित राहावे. आपण स्वत: व्यक्तिश: उपस्थित न झाल्यास भविष्यात आपली कोणतीही तक्रार/विनंती स्विकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.)**
**जिल्हा परिषद गडचिरोली**

**प्रतिलीपी**:- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.)**
**जिल्हा परिषद गडचिरोली**